२५६

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स,नागपूर ४४०००१
e-mail:-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

तातडीचे

पत्र क्रमांक / नाविमं /लेखा / 1285
नागपूर, दिनांक 25/ 04 / 2024

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

विषय : सन २०२३-२४ मधील राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची ( इ. १० वी व इ. १२ वी ) परीक्षा शुल्क प्रतिपूर्ति करणेसाठी Online द्वारे माहिती सादर करणेसाठी मुदतवाढ देणबाबत.

संदर्भ : १. क्र. रा.मं. /टं.वि. परीक्षा शुल्क प्रतिपूर्ति २३-२४/१६०३ दि.०२५-०४-२०२४

२. पत्र क्रमांक /नाविमं/लेखा/1173 नागपूर दिनांक १५/०४/२०२४

उपरोक्तय संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, टंचाईग्रस्त/दुष्काळग्रस्त भागातील इ .१० वी इ.१२ वी च्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ति ही राज्य मंडळ स्तरावरुन करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य ४० तालुके व याव्यतिरिक्त १०२१ महसूल विभागीत बाधित क्षेत्रातील सर्व "माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी/मार्च २०२४" मधील परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी अनुक्रमे http:// feerefund.mh-ssc.ac.in आणि http:// feerefund.mh-hsc.ac.in हया लिंकवर उपलब्ध करुण दिलेली आहे सदर लिंक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर (mahahsscboard.in) प्रसिध्द करण्यात आली आहे.संगणक प्रणालीच्या अनुषंगाने तयार करण्यात सूचना कार्यपध्दती यासोबत देण्यात येत आहे.

सदर योजना नव्याने कार्यान्वित झाली असून या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी १९ एप्रिल २०२४ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने माहिती भरण्याची मुदत देण्यात आली होती. मुदतवाढीच्या अनुषंगाने ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी यापूर्वी माहिती सादर केली आहे ,मुदत संपुष्टात आल्याने ज्या विद्यार्थ्यांची माहिती अप्राप्त असल्याने सादर केली नाही, अशा माहिती अप्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती online भरण्यासाठी , दि. ३० एप्रिल, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच याबाबत शाळा कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रपत्र 'अ' व प्रपत्र 'ब' प्रमाणपत्रासह विभागीय मंडळात जमा करायचे आहे,राज्यमंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यऊ नयेत.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी:

१. मा.सचिव,राज्य मंडळ पुणे यांना माहितीस्तव सादर .
२. शिक्षण उपसंचालक नागपूर ,विभाग नागपूर यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.
३. शिक्षणाधिकारी भंडारा/चंद्रपूर/नागपूर/वर्धा/गडचिरोली/गोंदिया यांना उचित कार्यवाहीस्तव सादर .

YUGAL